## —: वाहतुक नियंत्रण अधिसूचना :—

**क्रमांक:— नापोआ/ईद—ए—मिलाद/कक्ष—४/अधिसूचना/२६०५/२०१८, नाशिक,** दि. १९/११/२०१८.

ज्या अर्थी, नाशिकरोड परीसरात ''ईद—ए—मिलाद'' निमीत्ताने दिनांक २१/११/२०१८ रोजी निघणारे मिरवणुकी मध्ये मिरवणुक मार्गावर उभारण्यात येणारे स्टेज व मिरवणुकीस रहादारी मुळे अडथळा निर्माण होतो या करीता वाहतुक मार्गात बदल करणे आवश्यक आहे. मिरवणुकीचा मार्ग हा सर्व प्रकारच्या वाहनांना वाहतुकीसाठी पुर्णपणे बंद करणे आवश्यक असुन या बाबत माझी खात्री झाली आहे.

त्या अर्थी, मी लक्ष्मीकांत पाटील पोलीस उप आयुक्त, (परिमंडळ — १ व वाहतुक) नाशिक शहर. महाराष्ट्र शासन गृहविभाग प्र.एम.व्ही.ए.—११६/सीआर/३७/टिआर दि. २०/०९/२०९६ चे अधिसुचने नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये. मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून वाहतुकीची कोंडी होवू नये म्हणुन आम जनतेच्या सोईसाठी खालील निर्बंध अंमलात येणे करीता वाहतुक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे.

**मिरवणुकीचा मार्ग** -- ना. रोड गोसावीवाडी -- सुभाष रोड ने डॉ. आंबेडकर पुतळा — शिवाजी पुतळा — बिटको चौक — महात्मा गांधी रोड ने सत्कार पॉईट — दे.गाव चौकी समोरून विहीतगाव येथुन फिरून पुन्हा दे.गाव गांधी पुतळा — साने गरूजी रोडने गाडेकर मळा — दे.गाव.

**वरील मार्गावरील जाणा—या व येणा—या वाहतूकीसाठी खालील मार्गाचा अवलंब करावा.**

१) अनुराधा चौक ते आर्टीलरी सेंटर ते रोकडोबा वाडी पुलावरून विहितगाव बागुलनगर या मार्गाचा अवलंब करावा.

२) सिन्नर बाजुकडुन येणारी वाहतूक ही सिन्नरफाटा उडडाण पुलावरून दत्तमंदिर सिग्नल चौक येथुन इतरत्र जातील व नाशिक कडून सिन्नरकडे जाणारी वाहतुक ही दत्तमंदीर येथून उडडाण पुलाचा वापर करतील.

३) देवळाली कॅम्पकडून नाशिकरोडकडे जाणारी वाहतूक ही बागुल नगर विहीतगावी रोकडोबावाडी पुल अर्टिलरी सेंटर रोड ने दत्त मंदीरला येवून इतरत्र जातील.

**वरील सर्व प्रकारचे निर्बंध हे पोलीस सेवेतील वाहने, रूग्णवाहीका, शववाहीका व अग्निशन दलाची वाहने व या परिसरांत राणारे नागरीकांची वाहने यांना लागु राहणार नाही.**

वरील निर्बंध हे दिनांक २१/११/२०१८ सकाळी ७.०० ते दुपारी ४.०० वा. पावेतो अमलात राहतील. तसेच वरील वाहतुक नियंत्रण अधिसुचनेत आवश्यकते नुसार बदल करणेचे अधिकार राखुन ठेवणेत आलेले आहे.

सदरची अधिसुचना ही माझ्या सही व शिक्यानिशी दिनांक १९/११/२०१८ रोजी निर्गमित करीत आहे.

स्थळ :— नाशिक शहर.
दिनांक :— १९/११/२०१८.

पोलीस आयुक्त नाशिक शहर

(लक्ष्मीकांत पाटील)
पोलीस उप आयुक्त,
(परिमंडळ—१ व वाहतुक) नाशिक शहर

**प्रति,**
व्यवस्थापक, येरवाडा कारागृह, मुद्रणालय,पुणे--०६.
२/— आपणांस विनंती करणेत येते कि, सदरची अधिसूचनेची प्रसिध्दी पुढील राजपत्रात करावी.
**प्रत सस्नेह अग्रेषित :—** १) आयुक्त, म.न.पा.नाशिक. २) जिल्हाधिकारी, नाशिक.
**प्रत :—** १) प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक. २) जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, नाशिक.
**प्रत :—** सर्व पोलीसउपआयुक्त, सर्व स.पो.आयुक्त., सर्व प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे/शाखा, पोलीस आयुक्तालय नाशिक